# मुंबई विद्यापीठ

संचालक परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांचे
कार्यालय, विद्यानगरी परिसर मुंबई विद्यापीठ,
विद्यानगरी, सांताक्रुझ (पूर्व), मुंबई–४०००९८.

## परिपत्रक

DBoEE/ICC/2023-24/5

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे विभाग प्रमुख/संचालक, सलंग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य /संस्थाचे संचालक, संचालक, दूर व मुक्त अध्ययन संस्था, यांना कळविण्यात येते की, प्रथम सत्र २०२३ (उन्हाळी) परीक्षांचे निकाल जाहिर करण्याची कार्यवाही विद्यापीठ स्तरावर सुरू आहे. सदर परीक्षांमधील काही परीक्षांचे निकाल जाहिर करण्यात आलेले आहेत, परंतू अद्याप पर्यंत खालील तकत्यात नमूद अभ्यासक्रमांचे निकाल जाहिर करणे बाकी आहे.

| PROG NAME | SEM | PROG NAME | SEM | PROG NAME | SEM |
|---|---|---|---|---|---|
| B.COM FIN MGMT | VI | MMM | II | IDOL B.COM | VI |
| B.COM FIN MARKETS | V | BMS | V | IDOL B.COM | V |
| B.COM BBI | V | M.COM | IV | IDOL M.COM | IV |
| B.COM A&F | VI | M.COM | II | IDOL M.COM | II |
| B.COM TRANSPORT MGMT | V | M.COM | I | IDOL M.COM | III |
| B.COM INVESTMENT MGMT | VI | M.COM | III | IDOL TYBCOM | VI |
| B.COM ENVORMENTAL MGMT | VI | MCA | I | IDOL TYBA | V |
| MFM | II | MCA | II | IDOL TYBA | VI |
| | | | | IDOL TYBCOM | V |

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ च्या कलम (८९) नुसार विद्यापीठांच्या परीक्षांचे निकाल परीक्षेच्या शेवटच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत जाहिर करणे विद्यापीठास बंधनकारक आहे. महाविद्यालयांनी त्यांच्या प्रवेश क्षमतेच्या कमीत कमी १:५ प्रमाणात उत्तरपुस्तिकांचे मूल्यांकन करणे आवश्यक आहे. उपरोक्त तकत्यात नमूद परीक्षांच्या उत्तरपूस्तिकांची तपासणी समाधानकारक गतीने होत नसल्याचे दिसून येत आहे.

सबब, उपरोक्त तकत्यात नमूद उत्तरपूस्तिकांच्या मूल्यांकनासाठी आपल्या शैक्षणिक विभागातील, महाविद्यालयातील/संस्थेतील पात्र शिक्षकांना सुचित करावे. तसेच ज्या शिक्षकांची ऑनलाईन प्रक्रियेद्वारे मूल्यांकनासाठी नोंदणी प्रक्रिया पूर्ण केलेली नाही अशा शिक्षकांनी आपल्या प्राचार्या /विभाग प्रमुखा मार्फत नोदंणी प्रक्रिया पुर्ण करून घ्यावी.

विभाग प्रमुख, प्राचार्य / संचालक यांना सुचित करण्यात येते की, शनिवार व रविवार तसेच कार्यालयानी सुटीच्या दिवशी आपल्या महाविद्यालयातील/शैक्षणिक विभागातील कॅप सेंटर मूल्यांकनाच्या कामाकरीता शिक्षकांसाठी खूले ठेवण्यात यावे. तसेच शिक्षकांना याद्वारे आवाहान करण्यात येते की, आपण मूल्यांकनाच्या कामासाठी अधिक वेळ देवून उर्वरित उत्तरपुस्तिकांचे मूल्यांकन पुढील चार ते पाच दिवसांत पुर्ण करावे.

आपल्या महाविद्यालयातील/संस्थेतील पात्र शिक्षकांकडून उत्तरपुस्तिकांची तपासणी वेळेत करून घेण्याची जबाबदारी संबधित प्राचार्यांची असेल.

महाविद्यालयांनी त्यांच्या प्रवेश क्षमतेच्या कमीत कमी १:५ प्रमाणात उत्तरपुस्तिकांचे मूल्यांकन केलेले नसल्याचे आढळल्यास नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

**ऑनलाईन उत्तरपुस्तिका तपासणी नोंदणी प्रक्रियेसाठी खाली दिलेल्या माहितीचा वापर करावा :**

| | | | |
|---|---|---|---|
| ई मेल | mu.osdeshelpdesk@gmail.com | | |
| दुरध्वनी क्रमांक | 1) 7447455467 | 2) 9527656051 | 3) 7447458508 |
| | 4) 9527656175 | 5) 7447439565 | 6) 7447436317 |

**स्थळ : मुंबई**
**दिनांक २८/०७/२०२३**

**(डॉ. प्रसाद कारंडे)**
**प्रभारी संचालक**
**परीक्षा व मूल्यमापन मंडळ**

प्रती,
१) विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे विभाग प्रमुख/संचालक, सलंग्नित महाविद्यालयाचे प्राचार्य /संस्थाचे संचालक, संचालक, दूर व मूक्त अध्ययन संस्था

प्रत महितीस्तव
१) उपकुलसचिव, केद्रिंय मूल्यांकन केंद्र, परीक्षा विभाग मुंबई विद्यापीठ.